# २ रे सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, अक्कलकोट यांचे न्यायालयात

नियमीत दिवाणी दावा क्र. ८८/२०१८

लक्ष्मीबाई अस्वले

वि.

लक्ष्मीबाई पुजारी

## आदेश नि. क्र. १९ खाली

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेशीका XXII नियम ३ (१) अन्वये प्रतिवादी क्र. २ चे वारस दाव्यामध्ये समाविष्ट होवून मिळणकरिता दाखल केला आहे.

२. वादी यांनी असे नमूद केले की, यातील प्रतिवादी क्र. २ हे दिनांक १६/११/२०२१ रोजी मयत झाले आहेत. सदरचे अर्जासोबत वादीने प्रतिज्ञापत्र देखील दाखल केले आहे. तसेच प्रतिवादी क्र. २ मयत असल्याचा दाखला नि.क्र २१ सोबत दाखल केलेला आहे.

३. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर म्हणणे सादर करून आक्षेप नोंदविला की, सदरचा अर्ज मुदतीत नाही. प्रतिवादी क्र. २ हे दिनांक १६/११/२०२१ रोजी मयत झाले आहेत. त्यामुळे ९० दिवसात वारस रेकॉर्डवर न आल्याने दावा अबेट झालेला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज कायदयाने चालू शकत नाही. सबब अर्ज नामंजूर करावा, अशी विनंती केली आहे.

४. दोन्ही पक्षाच्या विधीज्ञांचे युक्तिवाद ऐकले. वादीचे वकील यांनी सदरचा दावा वाटपाचा कब्जेवहिवाटीचा व निरंतर ताकीदीचा असून प्रतिवादी नं.२ चे वारस प्रकरणात सामील असणे अत्यंत गरजेचे असल्याने त्यांना याकामी सामील करून घेणेत यावे अशी विनंती केली. तसेच कोविड १९ च्या प्रार्दुभावामुळे अर्ज देण्यास उशीर झाला आहे. अर्ज करण्यास जाणूनबुजून वेळ केलेला नाही असे सांगीतले व अर्ज मंजूर करण्याची विनंती केली. मुदत अधिनियम १९६३ च्या अनुसूची मध्ये आर्टीकल १२० अन्वये मृत वादीच्या किंवा अपीलकर्त्याच्या अथवा मृत प्रतिवादीच्या किंवा उत्तरावादीच्या वैध प्रतिनिधीला पक्षकार म्हणून सामील करून घेण्याकरता ‘दिवाणी प्रकिया संहिता, १९०८’ या अन्वये वादीच्या, अपील कर्त्याच्या, प्रतिवादीच्या किंवा प्रकरणपरत्वे उत्तरवादीच्या मृत्यूच्या दिंनाकापासून ९० दिवसांचा कालावधी नमुद केलेला आहे. तसेच आर्टीकल १२१ नुसार दावावसान अपास्त करण्याचा आदेश मिळवण्यासाठी ‘दिवाणी प्रकिया संहिता, १९०८’ अन्वये दावावसानाच्या दिनांकापासून ६० दिवसामध्ये अर्ज करता येईल.

५. वरील मुदत अधिनियम १९६३ च्या तरतुदींचा विचारात घेता, प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी हे दिनांक १६/११/२०२१ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. मा. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिर्णय **RE: COGNIZANCE FOR EXTENSION OF LIMITATION IN Suo-Moto Writ Petition (C) No.03/2020 dt.10.01.2022**, नुसार दिनांक १५/०३/२०२० ते २८/०२/२०२२ पर्यंतचा कालावधी मुदत मर्यादा मोजताना वगळण्याचे आदेश पारीत केले आहेत. त्यामुळे

सदरील प्रकरणी वादींना प्रतिवादीचे वारस दिनांक २९/०५/२०२२ पर्यंत सामील करण्यासाठी मुदत होती, तसेच दिनांक २८/०७/२०२२ पर्यंत दावावसान अपास्त करण्याचा आदेश मिळविण्यासाठी मुदत होती, परंतू वादीने प्रस्तुतचा अर्ज दिनांक २६/०९/२०२२ रोजी न्यायालयात दाखल केल्याचे अभिलेखावरून दिसून येते. त्यामुळे प्रस्तुत अर्ज दाखल करण्यास १२३ दिवसांचा विलंब झालेला आहे.

६. येथे हे नमुद करणे आवश्यक आहे की, वादीने प्रस्तुतचे अर्जासोबत विलंब माफीचा अर्ज व दावावसान अपास्त करण्याचा अर्ज देखील सादर केलेला नाही. विलंब माफीचा अर्ज व दावावसान अपास्त करण्याच्या अर्जाशिवाय वादीचा, प्रतिवादीचे वारस सामीलीचा अर्ज हा योग्य नाही. म्हणून आदेश.

## आदेश

१. नि. क्र. १९ वरील अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

MAHESH NARAYAN PATIL
Digitally signed by MAHESH NARAYAN PATIL
Date: 2022.11.04 16:34:38 +0530

**( एम.एन. पाटील )**

दि. १४/१०/२०२२

२रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
अक्कलकोट.